# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २३.०६.२०२४ रविवार**

.............................................................................................................................................

## बकरी चोरी करणारे आरोपी नागपुर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे फिर्यादी नामे —अरून नामदेवराव कुहीटे रा मोहपा धनकर मोहल्ला वार्ड क्र १४ यांनी रिपोर्ट दिला कि दिनांक २८/०४/२४ चे सकाळी १०/०० वा सुमारास फिर्यादिकडे काम करणारा नौकराने माहिती दिली कि दिनांक २७/०४/२४ चे सायंकाळी ०६/०० वा सुमारास शेतातील बकऱ्या चारून शेतातील खुल्या शेड मध्ये आणुन बांधुन ठेवल्या होत्या व दि २८/०४/२४ चे सकाळी १०/०० वा फिर्यादिचा नौकर बकऱ्या चारण्याकरीता शेतातील शेड मध्ये गेला असता जवळील बकऱ्यापैकी १६ बकऱ्या किं. १,३८,००० रू. च्या दिसत नाही कोणीतरी अज्ञात आरोपीने शेडच्या दरवाज्याच्या खुल्या जागेतुन प्रवेश करून बकऱ्या चोरी करून नेल्या आहे असे रिपोर्टवरून अप क्र. ३२८/२४ कलम ३७९ भा.दं.वि चा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयात गुप्त माहितगाराकडून खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, फूकट नगर नागपूर येथे राहणारा **सोहेल मेहबुब शहा, वय २१ वर्ष, रा. फूकट नगर इटाभट्टा चौक नागपूर** हा मागील काही महिन्यापासून आपले साथीदारांसह मिळून बकरी चोरीचे गुन्हे करीत आहे. अशा खबरेवरून दि. २२/०६/२०२४ रोजी सदर गुन्हयातील आरोपीचा कसोशीने शोध घेवुन सोहेल शहा यास फूकटनगर येथुन ताब्यात घेतले. त्यास कळमेश्वर येथील बकरी चोरीबाबत विचारपुस केली असता उडवाउडविचे उत्तरे दिली. त्यास विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता त्याने सांगितले की, त्याने त्याचे साथीदार नामे—**१) फैजान हफीज शेख वय २१ वर्षरा. उप्पलवाडी रजा टाऊन नागपूर २) मोहम्मद समीर मोहम्मद अब्दुल रहीम, वय २१ वर्ष, रा. नविन वस्ती दुर्गामंदीर चे मागे टेका नाका नागपूर ३. अविनाश रामदास निखारे वय ३२ वर्ष रानारायण पेठ प्रेमनगर नागपूर** यांचे सोबत कळमेश्वर येथे बकरी व बकरे चोरी केल्याची कबुली दिली. सदर आरोपीतांना दिनांक २२.०६.२४ रोजी अटक करण्यात आली. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक टिपले मो.नं ९९६०७५७१७४ करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली योगेश कामाले, पालीस उपनिरीक्षक श्री टिपले, व स्टॉफ यांनी पार पाडली.

# पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत दारू तस्करावर पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत दिनांक २२/०६/२०२४ रोजी मुखबीरचे खबरेवरून गांधी चौक सावनेर येथे एक इसम पांढ—या रंगाची ॲक्टीवा कमांक एम पी २८ एस एच २४३८ घेवुन जात असलेल्या खात्रीशीर खबरेवरून सदर इसमाला थांबवुन त्याचे वाहनाची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांच्या वाहनाचे डिक्कीत विदेशी दारू १) इंपिरिअर ब्लु च्या ०९ निपा प्रत्येकी १८० एम.एल प्रत्येकी किमत १६० रू प्रमाणे किंमत १४४०/— रू २) ऑफिसर चॉईस प्लास्टीक निपा ०७ निपा प्रत्येकी १८० एम.एल प्रत्येकी किमत १२५ रू प्रमाणे किंमत ८७५/— रू असा एकुन २३१५/— रू चा माल विक्री करीता वाहतुक करताना मिळुन आल्यांने त्यांच्या ताब्यातुन ॲक्टीवा गाडी क्र एम.पी २८ एस.एच २४३८ किंमती २५०००/— रू व २३१५ /—रू चा माल असा एकुन २७,३१५/— रू चा माल अवैधरित्या विनापरवाना मिळुन आल्याने आरोपी नामे— जगदिश भुरेलाल उईके वय ३६ वर्ष रा.वार्ड क्र ३ खैरी तायगाव ता सौंसर जि.पांढुर्णा यांचे विरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ६५ (इ) (अ) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वयें गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, पोहवा बंडु कोकाटे पोस्टे सावनेर पार पाडली.

पोलीस माहीती कक्ष
नागपुर ग्रामीण जि नागपुर